एक अच्छा विचार हमेशा अन्य अच्छे विचारों को आकर्षित करता है।

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २५ जानेवारी २०२५ | अंक४७ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# ग्रामीण भागात भाजीपाल्याचे दर घसरले, ग्राहकांना दिलासा, तर शेतकरी चिंतेत

## कवडीमोल दराने पालेभाज्यांची विक्री





मागील काही दिवसापासून अनेक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आठवडी बाजारात भाजीपाल्याचे दर घसरले आहेत. ग्राहकाला यामुळे दिलासा मिळाला आहे. त्याच्या रोजच्या खर्चात थोडी बचत झाली आहे. तर दुसरीकडे भाजीपाला उत्पादक शेतकरी चिंतेत सापडला आहे. टोमॅटो ५ तर वांगे १० रुपये किलोने विकत असल्याने भाजीपाला उत्पादक शेतर्कयांचा वाहतुकीचा ही खर्च निघत नसल्याचे चित्र आहे. यामुळे अनेक शेतर्कयांनी टोमॅटो आणि वांगे रस्त्यावर फेकून दिल्याच्या घटना घडल्या आहेत. शिवाय इतर भाजीपाल्यांचे ही दर कमी झाल्यामुळे भाजीपाला उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला. बाजारात मोठ्या प्रमाणात आवक होत असल्याने सद्यस्थितीला कमी दर असल्याचं सांगण्यात येत आहे. कवडीमोल दराने पालेभाज्यांची विक्रीआठवडी बाजारात भाजीपाल्यांची आवक वाढली आहे. पोषक वातावरणामुळे यावेळी भाजीपाल्यांचे उत्पादन वाढले आहेत. परिणामी, मुंबई, नवी मुंबई, कोल्हापूर, नाशिक, पुणे मार्केट यार्ड येथील तरकारी विभागात पाळेभाज्यांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने किंमती उतरल्या आहेत. भाजीपाला नाशवंत असल्याने झटपट विक्री करण्याचा सपाटा सध्या सुरू आहे.

त्यामुळे भाजीमंडईत दर कोसळले आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर ग्राहक राजाची सध्या मिजास आहे. त्यांना अनेक दिवसानंतर पालेभाज्यांची विविध रेसिपी चाखता येणार आहे. एरव्ही ग्राहकांच्या खिशाला भाजीपाला घेणे सुद्धा अवघड होऊन बसलं आहे. ग्रामीण भागातील बाजारात त्यामुळे सध्या ग्राहकांची भाऊगर्दी उसळली आहे.

### रब्बीचे पीक बहरणार

गेल्या पंधरवड्यापासून गायब असलेली थंडी अचानक वाढल्यामुळे धुळे जिल्ह्यातल्या रब्बी पिकांना त्याचा फायदा होणार आहे. तापम ानाचा पारा हा ८ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे कमी झालेल्या तापमानाचा फायदा गहू, हरभरा आणि अन्य पिकांच्या वाढीला होणार आहे. थंडीचा कडाका असाच कायम राहिला तर येणार उत्पन्नही चांगले राहील अशी आशा शेतर्कयांना आहे

# भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन संपन्न झाले




अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित कला गोविंद शिक्षण प्रसारक मंडळ व पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय कवी संमेलन अजिंक्य चॅरीटेबल ट्रस्ट बायफ रोड उरुळी कांचन या ठिकाणी संपन्न झाले प्रसंगी कवी, साहित्यिक, निवदेक ॲड. उमाकांत आदमाने, पुणे यांनी बहारदार सूत्रसंचालन करीत कवी कवयीत्रींची व रसिक माय बाप यांची मने जिंकली प्रसंगी कवी संमेलनाचे अध्यक्ष श्री. सुर्यकांत नामगुडे सर, प्रमुख म ार्गदर्शक श्री. शरद गोरे सर, श्री. माणिक देवकर सर, कवी किशोर टिळेकर सर , आयोजक मा प्रा. सुरेश वाळेकर सर आणि उपस्थित सर्व मान्यवर यांच्या हस्ते मला आकर्षक सन्म ानचिन्ह, सन्मानपत्र श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

# बिंदुसरा नदीपात्रात अतिक्रमित बांधकाम,कच-याचे ढीग आता सर्रास वृक्षतोड ; नगरपालिकेचे दुर्लक्ष :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२४ ) बीड शहरातून वाहणा-या बिंदुसरा नदीमध्ये मागील काही वर्षापासून नदीपात्रामध्ये भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन याला नगरपरिषद व जिल्हा प्रशासनाचा छुपा पाठिंबा दिसुन येत आहे. नदीपात्रामध्ये कच-यांचे भर टाकून त्यावर प्लॉटिंग करणे ,रस्ते बनवणे , बांधकाम करणे असे प्रकार सर्रास आढळून येत आहेत .आता यातच काही मंडळींनी नदीपात्रातील महाकाय वृक्षांची कत्तल करण्यास सुरुवात केली असून याकडे नगर प्रशासन , जिल्हा प्रशासन आणि वनविभाग सोयीस्करपणे डोळेझाक करत आर्थिक हितसंबंध जोपासत दुर्लक्ष करताना दिसते. संबंधित अतिक्रमण आणि बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर , रामनाथ खोड, शेख युनुस ,शिवशर्मा शेलार, मुबीन शेख,बीड जिल्हाध्यक्ष आप,अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष (इंटक) रामधन जमाले यांनी उपमुख्याधिकारी ,नगरपरिषद बीड सम्राट कदम यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.सविस्तर माहितीस्तव



बीड शहरातील बिंदुसरा नदी पात्रातील ब्लड झोन , ग्रीन झोन, रेड झोन ,येल्लो झोन असे विविध झोन नगरपालिका डायरीतून गायब झाले की काय ? अशी शंका निर्माण होत आहे. मोंढा रस्त्यालगत जुन्या हिंदू स्मशानभूमीच्या पाठीमागे बिंदुसरा नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असून अनाधिकृत बांधकाम करण्यात येत आहे. हे करत असताना शेकडो वर्ष जुने महाकाय वृक्षांची राजरोसपणे कत्तल केली जात आहे .प्रथम नदीपात्रात भर टाकायची त्या ठिकाणी जागा तयार करायची. त्या ठिकाणी छोटेसे धार्मिक स्थळ उभे राहायचे. मग त्यावर प्लॉटिंग टाकून नदीपात्रातील जमिन गिळंकृत करायची असा काहीसा प्रकार दिसून येत आहे. याबद्दल सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी नगरपालिका तसेच जिल्हा प्रशासनाकडे लेखी तक्रारी तसेच आंदोलनाद्वारे कारवाईचे मागणी केलेली आहे. यातच आता वृक्षतोडीमध्ये शेकडो वर्ष जुने तिन चिंचांचे व पाच लिंबांचे महाकाय नदीपात्रातील वृक्ष तोडण्यात आलेले आहेत. भूमाफियांना हे वृक्ष अडचण ठरत असावेत यामुळे हे वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. या सर्व प्रकाराकडे नगरपालिका प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन आणि वनविभाग दुर्लक्ष करत आहे. यामुळे अतिक्रमणधारकांचे मनोधैर्य वाढत असून निसर्गावर, नदीवर घाला घालून बिंदुसरा नदीपात्र गिळंकृत करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. असे प्रकार वाढत राहिल्यास १९८९ सारखी पूरस्थिती येऊन हजारो नागरिकांचे प्राण जाऊ शकतात याला जबाबदार कोण असेल? त्यामुळे प्रशासनाने नदीचे सीमारेषा आखून देणे. भुमाफियांनी केलेले अतिक्रमण काढून टाकणे. ज्यांनी वृक्षतोड केली आहे त्यांच्यावर कठोर करावी शासन स्तरावरून करण्यात यावी अशी म ागणी सामाजिक कार्यकर्ते तसा पर्यावरण प्रेमी यांनी केले असून भविष्यात मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

**वैद्यकीय मदतीसाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली, अर्जासाठीची प्रक्रिया पेपरलेस**

मुंबई, दि. २४: राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासननिर्णय काढण्यात आला आहे. या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत केली जाते. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेणे सहज सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणा-या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले. मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा कडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणा-या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सद्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशील, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणा-या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.
०००

# क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांचा २ दिवसीय बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड, दि. २४ :- राज्याचे क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते रविवार दि. २६ जानेवारी २०२५ रोजी मुख्य ध्वजारोहण सोहळा होणार आहे. यानिमित्त ते २ दिवसाच्या बीड जिल्हा दौ-यावर येत आहेत. त्यांचा नियेजित दौरा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे. शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ सायंकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर रोड बीड येथे आगमन व राखीव. सायंकाळी ८ वाजता लोटस मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल बीड येथे सदीच्छा भेट. स्थळ लोटसब मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल श्री. यशवंतराव चव्हाण नाटयगृह मार्ग बीड, संपर्क डॉ. अमित काळे ७३८५२४५५४८. सायंकाळी ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. रविवार २६ जानेवारी २०२५सकाळी ९.०० वाजता विश्रामगृह बीड येथून पोलिस मुख्यालय बीडकडे प्रयाण.सकाळी ९.०५ वाजता पोलिस मुख्यालय, बीड येथे आगमन. सकाळी ९.१५ वाजता भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण समारंभास उपस्थिती स्थळः पोलिस मुख्यालय, बीड सकाळी १० वाजता बीड येथून इंदापूर, जि. पुणेकडे प्रयाण

# संतोष देशमुखांच्या लेकीची आर्त हाक, मुंबईत निघणार जनआक्रोश मोर्चा, तारीख आणि ठिकाण ठरलं

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने जनआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहेत. त्यातच आता संतोष देशम ुखांना न्याय मिळावा या मागणीसाठी मुंबईत मोर्चा काढला जाणार आहेत. मुंबईतील मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान या ठिकाणी हा मोर्चा काढला जाणार आहे. मुंबईत होणा-या या जनआक्रोश मोर्चात हजारो नागरिक सहभागी होणार आहेत.मुखांची हत्या करणा-या आरोपींना शिक्षा मि ळावी आणि त्यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी मुंबईत जनआक्रोश मोर्चा काढला जात आहे. या म ोर्चासाठी देशमुख कुटुंबीय बीडच्या मस्साजोगमधून रवाना झाले आहेत. उद्या मुंबईत होणा-या मोर्चासाठी संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख, मुलगी वैभवी देशमुख आणि मुलगा विराज देशमुख सहभागी होणार आहेत. संतोष देशमुख यांचे कुटुंबीय मस्साजोगमधून मुंबईकडे रवाना झाले आहेत. मुंबईतील मेट्रो सिनेमा ते आझाद मैदानापर्यंत हा मोर्चा काढला जाणार आहे.वैभवी देशमुख काय म्हणाली?उद्या शनिवारी २५ जानेवारी २०२५ मुंबईत मोर्चा काढला जाणार आहे. या मोर्चाचे स्थान मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान असे असणार आहे. माझ्या वडिलांवर जो अन्याय झाला आहे, त्यांच्या आधी ज्या कोणावर अन्याय झाला आहे आणि जे लढा उचलू शकले नाहीत त्यासाठी आम्ही लढा उभारत आहोत. तसाच एक लढा आम्ही मुंबईत उभारत आहोत. गेल्या मोर्चात तुम्ही मोठ्या संख्येने सहभागी झाला होतात. तसंच तुम्ही या मोर्चातही सहभागी व्हा, अशी मी विनंती करते. आम्ही येतोय तुम्ही पण या, असे आवाहन वैभवी देशम ुख यांनी व्हिडीओद्वारे केले आहे. स्व. संतोष देशमुख व स्व.सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय द्याः! मोठया संख्येने उपस्थित रहा..! अभी नही, तो कभी नहीं..! अशा आशयाचे मेसेज सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.



## कृष्णा आंधळे फरार घोषित

दरम्यान संतोष देशमुख खूनाचा छडा लावण्यासाठी पोलीस, एसआयटी आणि सीआयडी काम करत आहे. सुरुवातीला हा तपास पोलीसच करत होते. पण बीड जिल्ह्यातील नेत्यांच्या मागणीनंतर एसआयटी स्थापन करण्यात आली. तसेच हा तपास सीआयडीकडे देण्यात आला. त्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरली. या प्रकरणात मुख्य आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, विष्णू चाटे. प्रतिख घुले, महेश केदार यांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर मकोकाही लावण्यात आला. पण कृष्णा आंधळेचा अनेक ठिकाणी शोध घेऊनही तो अजून सापडलेला नाही. त्याच्यावरही मकोका लावण्यात आला. आता त्याला फरार घोषित करण्यात आलं आहे.

बीड/महाराष्ट्र
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

## प्रजासत्ताक दिन चिरायू होवो

-प्रजासत्ताक दिवस : हा दिवस प्रत्येक भारतीयांसाठी फार महत्वाचा आहे. त्यापैकी एक म्हणजे मप्रजासत्ताक दिनफ हा होय. दर वर्षी जानेवारी महिन्याच्या २६ तारखेला भारताचा मप्रजासत्ताक दिनफ साजरा केला जतो. आपला भारत १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. पण त्याची लोकशाही राज्य घटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. म्हणून हा मप्रजासत्ताक दिन म्हणून मानला जातो. आमचा भारत हे एक मोठे लोकशाही राज्य आहे म्हणजे हे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य आहे. हा अधिकार भारताच्या घटनेनुसार २६ जानेवारी १९५० साली मिळाला. त्यादिवसापासून प्रजेची सत्ता सुरु झाली ,हा दिवस भारतात सर्वत्र साजरा केला जातो. भारताच्या राजधानीत या दिवशी सकाळी ध्वजारोहणा नंतर लालकिल्ल्यावरून पंतप्रधान्नांचे राष्ट्राला उद्देशून भाषण होते. या समारंभाचा मुख्य कार्यक्रम भारताची राजधानी दिल्ली येथे होतो. या कार्यक्रमात भारतात सर्व घटकराज्ये भाग घेतात. भारताच्या सर्व क्षेत्रातील वैभवाचे दर्शनघडविणारी भली मोठी मिरवणूक काढतात. प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात, शहरांत आणि गावागावातून मप्रजासत्ताक दिनफ साजरा होतो. शाळांतून, सरकारी कार्यालयांतून व अन्यत्रही सकाळी ध्वजवंदन व अन्य मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. ठिकठीकाणी प्रभातफेर्या भाषणे होतात

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द व बुद्रुक ची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



बीड : शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ या वर्षा साठी शैक्षणिक सहलीचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागापूर खुर्द व बुद्रुक यांनी छत्रपती संभाजीनगर व परिसर या ठिकाणी केले होते.सदर सहली मध्ये भद्रा मारुती, घृष्णेश्वर मंदिर, वेरूळची लेणी, देवगिरी किल्ला, सिद्धार्थ गार्डन, प्राणी संग्रहालय, पानचक्की, बीबी का मकबरा, एकनाथ महाराजांचे समाधी स्थळ पैठण आदी ठिकाणी भेटी देण्यात आल्या. व तेथील सर्व माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सदर सहलीमध्ये दोन्ही शाळेचे मिळून ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.सदर सहल शिक्षणाधिकारी श्री फुलारी साहेब, गटशिक्षणाधिकारी श्री समंदर खान साहेब, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे , केंद्रप्रमुख श्री जलील शेख, नागपूर खुर्द सरपंच नारायण साळुंके , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंके, आदींच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.यावेळी सर्व धार्मिक, सांस्कृतिक ऐतिहासिक ,मनोरंजनात्मक ,आशा सर्व ठिकाणी भेट दिल्यामुळे मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.सदर सहल यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन जोगदंड, नागपूर बुद्रुकचे मुख्याध्यापक युवराज साळुंके , प्राथमिक पदवीधर सुधीर कदम, ज्येष्ठ शिक्षिका छाया मेहत्रे, अलका गेठे, प्रतिमा छत्रबंद ,प्रज्ञा उजगरे, सविता राऊत, अजित मुळूक , सखाराम साळुंके, मिरगे मॅडम यांनी परिश्रम घेतले. सदर सहलीसाठी माध्यमिक विभागाचे पुरंदरे , आगार विभागाचे सचिन होले व वाहन चालक माधव वैष्णव यांचे सहकार्य मिळाले. सहल यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल नागापूर खुर्द व बुद्रुक च्या ग्रामस्थांनी वाहन चालकाचा विशेष सत्कार केला.

## मानवी जीवनाचा अर्थ सांगणारे प्रेरणादायी, प्रबोधनात्मक आत्मकथन म्हणजे जागरण

बालवयापासून मुलांवर योग्य संस्कार, शिस्त घडविण्यासाठी प्रत्येक आई वडील अतोनात प्रयत्न करत असतात. आपल्या मुलाचे भविष्य उज्ज्वल असावे, त्याने जीवनात खूप प्रगती करावी त्यासाठी अपार कष्ट परिश्रम करुन मुलाने आपले, आपल्या गावाचे, राज्याचे, देशाचे नाव मोठे करावे, अशी स्वप्ने पालक पाहतात आणि त्यासाठी सखोल प्रयत्न करतात. पण वास्तवाचा विचार केला तर आजच्या वैज्ञानिक तांत्रिक युगात मनुष्य अंतरिक्षात पोहचला आहे परंतु शेजा-याचे घर दूर जात आहे ..माणसाला माणसाजवळ आणणे म्हणजे खरी प्रगती आहे. ऋणानुबंधाची नाती दुरावत आहे, प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराने थैमान मांडले आहे, माणुसकी धर्म विसरून माणसे जातीभेद, प्रांतभेद या विळाख्यात अडकत चाललेली आहेत.दररोज वर्तमानपत्रात महिला, मुली किती असुरक्षित आहेत हे आपण वाचत आहोत. वास्तव खूप भयानक आहे.

कविता लिहिण्याचा छंद मला असल्यामुळे सामाजिक विषयांवर, प्रश्नांवर लिहीण्याचा नेहमी प्रयत्न असतो. अनेक कथासंग्रह, काव्यसंग्रह, आत्मचरित्र, कादंब-या, महापुरूषांवरील पुस्तके वाचण्यात आली. परंतु श्री भारत सातपुते जेष्ठ साहित्यिक, आदर्श शिक्षक लातूर यांचे जागरण आत्मचरित्र वाचल्यानंतर ख-या अर्थाने जीवनाचे सार्थक कसे होते हे चांगले समजले. त्यातील काही प्रमुख गोष्टी नक्कीच जीवनात दिशा देणा-या ठरल्या. महापुरूषांच्या विचारांचे सार्थक कृतीतून, आदर्श कार्यातून कसे करावे हे भारत सातपुते सरांच्या शुद्ध आचरण, व्यवहार, त्याग कष्टातून समजले.

संभाषणापेक्षा आचरणांचा प्रभाव जास्त असतो या सुविचाराचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आदरणीय श्री भारत सातपुते सरांचे जागरण आत्मचरित्र होय असे मनापासून सांगावेसे वाटते. जागरण आत्मचरित्र वाचल्यानंतर अनेक महत्त्वाच्या गोष्टी शिकायला मिळाल्या यामध्ये प्रामुख्याने काही गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करावा वाटतो..

गरीब परिस्थितीमुळे खचून न जाता स्वतःलाच सिद्ध कसे करावे अशी प्रेरणा देणारा ज्ञानाचा संच म्हणजेच जागरण होय. स्वतःवरील आत्मविश्वास म्हणजेच यशाची गुरुकिल्ली आहे असा संदेश देणारा प्रेरणादायी सामाजिक ग्रंथ म्हणजे जागरण. आपले समाजाप्रती काही देणे लागते, यामुळे समाजातील वास्तव प्रश्नांवर परखडपणे भाष्य करून ख-या अर्थाने समाजप्रबोधन करणारे माध्यम म्हणजे जागरण आहे. काम हीच पुजा असते हे प्रामाणिक, निष्ठेने, सकारात्मक विचारांनी केलेल्या कार्याने सिद्ध करणारे महान व्यक्तिमत्व म्हणजे जागरण आहे. स्वतःच्या मुलापेक्षाही कविता, लिखाण, साहित्य यावर जास्त प्रेम करणारे वैचारिक विद्यापीठ म्हणजे जागरण होय. विद्यार्थी म्हणजे भारत देशाचं भविष्य त्यामुळे बालवयापासून त्यांच्यावर व्यायाम,योगा, खेळ, छंद जोपासण्यासाठी रुची निर्माण करणारे आणि शिस्तीचे धडे शिकवणारे क्रीडासंकुलन म्हणजे जागरण.

परीक्षेत कॉपी केल्याने विद्यार्थी, पालक, गाव, देशाचे नुकसान होते त्यामुळे कडक शिस्तीने कॉपीमुक्त अभियान राबविणारे शैक्षणिक क्षेत्रातील सिंघम म्हणजे जागरण.

प्रामाणिकपणे कार्य करतांना अनेक चुकीचे झालेले आरोप, अनेक पोलीस केसेस तसेच मोठ्या शासकिय अधिकारी, राजकारणी लोकांचा आलेला दबाव यांना न जुमानता भारतीय राज्यघटनेतील कलम

कायद्याप्रमाणे संकटाशी सामना करणारे, झुंज देणारे एक आदर्श भारतीय नागरिक म्हणजे जागरण.

आपला प्रत्येक श्वास ही निसर्गाची देण आहे यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन करणारे झाडांवरील खरे प्रेम म्हणजे जागरण.

अनेक महापुरूष, देवी देवता, संत यांची नावे वाईन शॉप, बियर बार, मटन सेंटर , विविध व्यावसायिक दुकानांना देऊन महापुरूषांच्या विचारांचा अवमान करणा-यांना कडक शासन करण्यास भाग पाडणारे आणि ख-या अर्थाने समाजजागृती करणारे लिखाणातील आधुनिक अस्त्र म्हणजे जागरण.

कविता कशी लिहावी, लिखाणात सातत्य कसे असावे, समाज उपयोगी साहित्य , बाल-साहित्य, व्यवस्थेच्या चुकीच्या गोष्टींवर प्रश्न निर्माण करणारे साहित्य आणि माणसाला माणुसकी धर्म शिकवणारे साहित्य म्हणजे जागरण होय.

मानवाला जीवनाचा खरा अर्थ सांगणारे प्रभावी साधन म्हणजे जागरण.आर्थिक परिस्थिती वाईट असतांनाही

मुलांना आदर्श, संस्कार, शिस्त देवून आपल्यापेक्षाही लेकरांना उच्चशिक्षित करणारे कुटुंबवत्सल सुत्र म्हणजे जागरण.

सध्या भारत देशासमोर जी आव्हाने आहेत यात प्रामुख्याने व्यसनाधिनता, भ्रष्टाचार, संस्कार विसरणारी यूवकांची आताची पिढी, या सर्व गोष्टींवर , प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्याचे एकमेव माध्यम म्हणजे जागरण आहे.

प्रत्येकांनी जागरण काळजीपूर्वक वाचावे तसेच आपल्या कुटुंबातील सदस्यांना वाचायला सांगावे, मित्र मंडळी, नातेवाईक, शाळेतील, महाविद्यालयांमधील ग्रंथालय, सार्वजनिक वाचनालय अशा सर्व ठिकाणी जागरण उपलब्ध करून दिले पाहिजे आणि प्रत्येकांने वाचावे यासाठी आपण सर्व आग्रही राहिलो पाहिजे असे मला वाटते. एकदा हातात घेतल्यानंतर हातातून ठेवावे वाटत नाही.

संस्काराचं दर्शन म्हणजे जागरण,
साहित्यासाठी सर्व काही अर्पण म्हणजे जागरण
चुकीच्या गोष्टींवर प्रहार म्हणजे जागरण,
प्रबोधनात्मक आधार म्हणजे जागरण
निःस्वार्थी सेवा म्हणजे जागरण,
शासकीय सेवेत असतांनाही
व्यवस्थेविरोधात लढा म्हणजे जागरण
परिवर्तनाची साक्ष म्हणजे जागरण,
युवकांच्या भविष्यासाठी दक्ष म्हणजे जागरण
शिक्षकांसाठी आदर्श कार्यांचे समर्पण म्हणजे जागरण,महापुरूषांच्या विचारांचे दर्शन म्हणजे जागरणसत्याचा खरा ध्यास म्हणजे जागरण,प्रत्येकाचा आत्मविश्वास म्हणजे जागरण ..संकटांशी झुंजणारे शौर्य म्हणजे जागरण...व्यथा, वेदना, वास्तव मांडणारे आधुनिक धैर्य म्हणजे जागरण...
जीवनाची खरी दिशा म्हणजे जागरण,
शुद्ध आचरणाची भाषा म्हणजे जागरण.
हृदयी कायम राहील असा जीवनपट म्हणजे जागरणचांगला मार्ग दाखवणारी पायवाट म्हणजे जागरण.
वैज्ञानिक युगातील विश्वास म्हणजे जागरण,
बंधुता पेरणारा श्वास म्हणजे जागरण

आम्ही स्वतः ला भाग्यवान समजतो आदरणीय श्री भारत सातपुते सरांचा सहवास, मार्गदर्शन आम्हाला मिळत आहे. त्यांचे आत्मचरित्र वाचून भविष्यातील प्रवासासाठी आम्हाला दिशा मिळाली आहे.

**-विजयकुमार रामराव पांचाळ**
**छत्रपती संभाजीनगर**
**संपर्क: ८८०५६१८१५४**

## संघर्ष व मेहनत शिकवणारा बीड जिल्हा

बीड जिल्हा हा राज्यातला ख-या संघर्ष शिकविणारा, मेहनत शिकविणारा जिल्हा होता. तीच बीडची ओळख होती. अध्यात्मिक संप्रदायात विविध संतांच्या विचारांनी पुनीत झालेला जिल्हा अशीच बीडची ओळख होती. मात्र मागच्या काही काळात विकासाच्या संकल्पनेवर सारे चेहरे रंगविले जाऊ लागले आणि बीड जिल्हा म्हणजे मागास जिल्हा, ऊसतोड कामगार पुरविणारा जिल्हा अशी ओळख बिडकर म्हणून आम्ही आणि आमचे लोकप्रतिनिधीच मिरवू लागले. ऊसतोड कामगार पुरविणारा जिल्हा हे बीडचे एक अंग आहे, नाही असे नाही, मात्र केवळ तीच बीडची ओळख नव्हती.आता तर मागच्या एक दिड महिन्यापासून बीडची ओळख बाहेर सांगू नये असे वातावरण राज्यात निर्माण झाले आहे. संतोष देशमुख यांची झालेली हत्या नक्कीच नृशंस म्हणावी अशीच आहे, आणि त्याचा निषेध झालाच पाहिजे, पण केवळ तीच बीडची ओळख नाही. या हत्याकांडानंतर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीही बीडमध्ये अराजक सुरु असल्याचे सांगितले. बीडमध्ये कायदा सुव्यवस्थेच्या संदर्भाने काही प्रश्न निश्चितच आहेत, त्याची प्रभावी सोडवणूक झालीच पाहिजे, मात्र त्यासाठी केवळ बीड फार वाईट आहे म्हणून भागणार नाही. आजच्या घडीला बीडच्या लोकांना बाहेर कोणी खोलीही द्यायला तयार नाही अशी परिस्थिती या सा-या गोष्टींमुळे निर्माण झाली आहे. बीडमध्ये वाळू माफिया आहेत असे सांगून मुख्यमंत्री मोकळे झाले, मात्र आता त्यांचेच राधाकृष्ण विखेंसारखे मंत्री वाळूच्या गाड्यांबद्दल मचालू द्या, ते आपलेच आहेतफ असे जाहीरपणे बोलत असतील तर एकटे बीडचा राज्यात वेगळे आहे असे कसे म्हणता येईल ? एक बिडकर म्हणून आता आपला कोणता चेहरा प्रकर्षाने समोर आणायचा याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे.मागच्या महिनाभरापासून राज्याच्या वेगवेगळ्या भागातील लोक बीड बद्दल केवळ आणि केवळ वाईट तेच काय ते जगासमोर सांगत आहेत. ज्यांना बीडकरांच्या वेदनांशी फार काही देणेघेणे असते हे कधी जाणवले नाही, बीड जिल्ह्यात दुष्काळ असताना राज्याच्या इतर भागांमधून कधी इकडे मदतीचा ओघ वाहू द्यावा यासाठी ज्यांनी कधी प्रयत्न केले नाहीत, बीड जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी कधी ज्यांची जीभ उचलली नाही अशा अंजली दमानिया, तृप्ती देसाई यांना बीडची वाईट बाजू सांगताना मात्र किती बोलू आणि किती नको असे होते, हे सा-या राज्याने अनुभवले आहेच. त्यांचे ठीक आहे, त्यांना बीडचे चांगुलपण कदाचित पाहायचेच नाही, कारण त्यासाठी त्यांना कोणी माध्यमांमध्ये चर्चेला बोलावणार नाही, पण बीडकर म्हणून आपल्याला काही गोष्टींचा विसर पडून कसे चालेल? खोखोच्याविश्वचषकामध्ये देशाला विजेतेपद मिळाले, या संघाची कर्णधार असलेली प्रतीक्षा इंगळे बीड जिल्ह्यातील आहे, देशपातळीवर बीडचं नाव झळकविणारा अविनाश साबळे देखील बीड जिल्ह्यातीलच. ही बीडची ओळख होत नाही का? देशपातळीवर प्रजासत्ताक दिनाच्या परेडला फार महत्व असते, त्यासाठी बीड जिल्ह्याच्या देवडीची कन्या असलेल्या दामिनी देशमुखची निवड झाली, राष्ट्रीय पातळीवरील शूटिंग स्पर्धेत व्यवसायाने अभियंता असलेल्या संध्या फरताडे यांनी यश मिळविले, त्या देखील बीडच्याच. मागच्या अवघ्या काही दिवसातील या घटना, बाकी इतिहासात जाऊन सांगायचे तर अनेक गोष्टी आहेतच. नुकतंच साखर उद्योगातील मानाचा मानला जाणारा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा व्यवस्थापनामधील दुसरा पुरस्कार माजलगावच्या छत्रपती साखर कारखान्याला मिळाला, मल्टीस्टेट मध्ये अनेक गोष्टी घडत असतानाही मंगलनाथ परिवार, किंवा तुळजाभवानी परिवाराने आपले एक नाव टिकविले आहे, ते देखील बीडचेच, रेशीम उद्योगात नेकनुरसारख्या ठिकाणी समृद्धी सरिकल्चरच्या माध्यमातून काम करणारे थोरात दाम्पत्य बीडचेच. बाकी शेती क्षेत्रातील वेगवेगळे प्रयोग करणारे असतील, सामाजिक क्षेत्रात काम करणारे संतोष गर्जे, दीपक नागरगोजे, दत्ता बारगजे हे चेहरे बीडचेच. शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून सामूहिक विवाहाची चळवळ राबविलेले बाळू ताकट हे बीडचेच, मानवलोक संस्था देखील बीडचीच इतर कोणी बोलतील का नाही माहित नाही, मात्र बीडकरांनी तरी आपल्या जिल्ह्याची खरी ओळख ही आहे हे आता सांगायला हवे, चर्चा याच्या व्हायला हव्यात.मागच्या एक दिड महिन्यापासून जिल्ह्याची चर्चा होतेय ती केवळ वाईट अंगानेच, बीड म्हणजे दहशतीचे केंद्र असे काहीसे चित्र राज्यभरात निर्माण झाले आहे. मात्र हे सारे होत असताना बीडचे नाव अभिमानाने घ्यावे अशा काही घटनाही घडल्या. असे अभिमान वाटावे असे प्रसंग अजूनही आहेतच, त्याची चर्चा होणार कधी ? खरेतर अशांचे अभिनंदन होऊन ही बीडची ओळख म्हणून समोर यायला हवे.

## दुर्घटनेत मृत्यू पावणा-याच्या जीवाचे मूल्य केवळ पाच लाख!

दुर्दैवाने एखाद्या ठिकाणी अपघाताची घटना घडली अथवा नैसर्गिक संकट कोसळले असेल....अशा प्रसंगी दुर्दैवाने काही मृत पावतात तर काही जखमी होतात. नेहमीप्रमाणे यात मृत पावणा-या व्यक्तीच्या परिजनाला सहानुभूतीपर मदत म्हणून शासन दरबारातून-शासनाच्या तिजोरीतून वर्षानुवर्षांपसून केवळ मपाच लाख रुपयेफ तर जखमींना प्रत्येकी मपन्नास हजार रुपयेफ उपचारासाठी देण्याची घोषणा केली जाते.

घटनेची तीव्रता वाढून जन आक्रोश उफाळून येऊ नये म्हणून जखमेवर मलम लावण्याचा हा मानभावीपणा असतो. ब-याच वेळा ह्या घोषणा हवेत विरून जातात. जे दुर्घटनाग्रस्त असतात त्यांना मदत न मिळता दुसरेच परस्पर मलिदा लाटतात, अशाही गोष्टी कानावर येतात.

येथे आमदार-खासदारांचे भत्ते, पेन्शन वाढीचा प्रस्ताव-ठराव मात्र कसलाही गाजावाजा न करता, आंदोलन-मोर्चे न काढता एकमताने मंजूर केले जाते. अर्थात शासनाच्या तिजोरीवर मात्र कोट्यवधी रुपयांचा भार पडतोच. अशा गरज नसलेल्या या श्रीमंतांना अधिक श्रीमंत केले जाते.

मंत्र्यांच्या दौ-याकरीता लाखों रुपये खर्च होतात. एखाद्या मंत्र्याच्या १५ मिनिटांच्या भाषणासाठी स्टेज उभारणे, बैठक व्यवस्था ( हजारों खुर्च्या, त्या रिकाम्या राहिल्या तरी चालतील! ) सुरक्षा व्यवस्था, मखानपानफ यासाठी कोटीच्या कोटी उड्डाणे घेतली जातात. मध्यंतरी महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याप्रसंगी पुरस्काराची रक्कम २५ लाख होती आणि त्यासाठी खर्च १४ कोटी झाल्याचे सांगितले जाते. मशासन आपल्या दारीफ याचा प्रचार करण्यासाठी सुमारे ५२ कोटी रुपये खर्च केल्याचेही बोलले जाते. बरेच शेतकरी, मजूर, कामगार कष्टकरी बांधव मात्र लाख-दोन लाख रुपये कर्ज फेडणे शक्य होत नाही म्हणून आत्महत्या करतो. अपघातात वा नैसर्गिक आपत्तीत मृत पावणा-या, जखमी होणा-या गोरगरीब जनतेसाठी मात्र तूटपूंजी रक्कम !



निवडणूकीत जो-तो भली मोठी गोंडस आश्वासने-सहानुभूती-प्रलोभने देतो. निवडून आल्यावर स्वतःचे, भत्ते पेन्शन तेवढे मात्र वाढवून घेतात. नंतर हेच नेते जनतेला दिलेल्या आश्वासनांना म चुनावी जुमलेफ म्हणून मतदारांच्या तोंडाला पाने पुसतात... मअनब अपघाती वा नैसर्गिक आपत्ती कारणाने मृत व्यक्तींसाठी पाच लाख व जखमींसाठी पन्नास हजार रुपये तेवढीच किंमत लावतात !फ केवढा हा दुटप्पीपणा. मृतांमध्ये घरातील प्रमुख कर्ता व्यक्ती असू शकते वा तरुण की ज्याला स्वतःचे भविष्य घडविण्याच्या उंभरठ्यावर असताना जीवनाचा शेवट होतो. त्या परिवारातील अनमोल व्यक्तीचा अशा स्वरुपात मृत्यू होत असेल, परिवाराची छत्रछाया हरपली जात असेल, परिवाराचा आधारच गेला असेल तर त्यासाठी त्याची मुल्ये केवळ मपाच लाख रुपयेफ रक्कम खरचं पुरेशी आहे का? तरुणाने काही उद्योग सुरू करण्यासाठी एक लाख मागितले तर त्याला दिले जात नाही. पण तोच अपघाती मृत्यू पावला तर पाच लाखांची घोषणा होते. म्हणजे या देशात कुटुंबाला मदत हवी असेल तर घरातील कोणाला तरी मरावे लागते !

म नेमेचि येतो मग पावसाळा म या उक्तीप्रमाणे निवडणुका येतात, पैसे वाटले जातात मजुमलेफ ऐकवले जातात अगतिक जनता याला बळी पडते, हे निवडून येतात आणि मग पुन्हा ये रे माझ्या मागल्या! जनतेमुळे उदार होणारी ही मंडळी जनतेच्याच जीवाशी मात्र खेळ खेळत असते. मधूर्त आमचे नेता अनब भोळी आमची जनताफ असेच म्हणावे लागेल.

कोणी मेल्यानंतर मृताची अशी थट्टा करण्यापेक्षा अशा घटना वारंवार होणार नाही यासाठी काही उपाय योजना करण्याकडे शासनाचा कल असला पाहिजे. आज सर्वत्र महागाई वाढत आहे याची जाणीव असून देखील पाच लाख अनब पन्नास हजारांवर जनतेचे समाधान करणे खरचं कितपत योग्य आहे? दुर्घटनेत अथवा नैसर्गिक आपत्ती मृत्यू पावणा-या व जखमी होणा-यांच्या त्या रक्कमेत भरघोस वाढ होण्यासाठी आमदार-खासदार शासन दरबारी मागणी व प्रयत्न करतील तसेच शासनाला देखील सदबुध्दी सूचेल अशी आशा बाळगू या...

राजेंद्र चौधरी.
रोझोदा. ता.रावेर.
जि. जळगाव
मो.७७००९८२७६५

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २५ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## लोकसाहित्य हा भारताच्या प्राचीन संस्कृतीचा गाभा ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी- जगदीप वनशिव
पुणे-: मफ लोकसाहित्य हा भारताच्या प्राचीन संस्कृतीचा गाभा असून, जुनी शिल्पं, शिलालेख, लोकगीते जतन करणे काळाची गरज आहे.फ्फ असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक संघ धनकवडी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिशाल शिक्षण मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी लोकाकलेतून लोकशिक्षण या विषयावर श्री यादव बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाजीराव गायकवाड, रानकवी जगदीप वनाशिव, सोमनाथ नाईक, भालचंद्र निखळ, बबन मांढरे, रामचंद्र चव्हाण, शकुंतला झगडे, सुनिता वाघमारे, प्रमोद पाटील श्री अकोलकर, श्री मधुकर नवले, आदी उपस्थित होते.

श्री यादव म्हणाले, मफ पूर्वीच्या काळी दशावतार, कीर्तन, भजन, गोंधळ, लावणी, तमाशा, वासुदेव, बहुरूपी, शाहिरी या माध्यमातून समाजाचे प्रबोधन आणि मनोरंजन व्हायचे. वारकरी संप्रदायाचा डोलारा संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेर्श्वर, संत एकनाथ आदी संतांनी कीर्तन, प्रवचन, भजन, भारुड सादर करून लोक जागृती केल्यामुळे ऊभा राहिला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहिरांनी पोवड्याच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आंदोलनात, व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कवी, शाहीर यांचा मोठा सहभाग होता. लावणी, तमाशा, वासुदेव, यांनी लोकाकालेतून लोकजागृती केली.फ्फ

लोकदेव श्रीखंडोबा आणि लोकदेव विठोबा ही महाराष्ट्राची संस्कृती आणि वारसा जतन करणारी ऊर्जा केंद्र आहेत असे सांगून श्री यादव यांनी लोककलेचा ठेवा व्याख्यानातून उलगडून ज्येष नागरिकांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी प्रमुख पाहुणे निवेदक पत्रकार रानकवी जगदीप वनशिव यांनी श्वास कविता सादर केली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाजीराव गायकवाड यांनी केले. सूत्रसंचलन शकुंतला झगडे यांनी केले. यशवंतराव चव्हाण व्याख्यात मला धनकवडी येथील ज्येष्ठ नागरिक विरंगळा केंद्राच्या सभागृहात संपन्न झाला

## आयु .देवेंद्र गावंडे कवी ,गायक यांना.



दिनांक २१/१/२०२५ ला. ३२ वा राज्यस्तरीय गदिमा कविता महोत्सव २०२५ मध्ये कविता महोत्सवाचे अध्यक्ष आदरणिय ज्येष्ठ कवीवर्य डॉ. विठ्ठल वाघ आणि गदिमांचे सुपुत्र आनंदजी माडगूळकर यांच्या कुशल हस्ते गदिमांचे वारसदार पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सेवा संस्था, मांगल्य विकास सेवा संस्था संत तुकाराम नगर पिंपरी पुणे १८. आयोजित करण्यात आलेल्या सत्कार कार्यक्रमा मध्ये. आयु देवेंद्र गावंडे यांना साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे लिखीत अग्निदिव्य मौलिक पुस्तक भेट देऊन सन्माननित करण्यात आले. मा. राजुभाऊ आवळे (अध्यक्ष मा. वि. से. सं.) मा. दादाभाऊ आल्हाट (सा. कार्यकर्ते) मा. रोहन सकट्टे ( सा. कार्यकर्ते) मा. अजीजभाई शेख (सा. कार्यकर्ते) पुढील साहित्यिक क्षेत्रातील वाटचालीस हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. दिनांक:२३/१/२०२५

## ज्ञानवर्धिनी मंडळाच्या विश्वविक्रम वंडर बुक रेकार्डमध्ये विधी बन्सोड ची नोंद



ज्ञानवर्धिनी विद्या प्रसारण मंडळ नाशिक या संस्थेच्या वतीने बालकवी स्पर्धेच्या रोप्यमहोत्सवी वर्षानिमित्त रुपेरी काव्यहोत्र, मध्ये ६८० कवींनी मराठी कविता वाचन करून विश्वविक्रम केला.या विश्वविक्रमाचे वंडर बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली. या स्पर्धेत विधी बन्सोड हीने आपल्या कवितांचे सादरीकरण करून विशेष स्थान प्रस्थापित केले.या कार्यक्रमाला अभिनेत्री ऋवेदी प्रधान, गुरुजी रुग्णालयाचे संस्थापक प्रकाश पाठक, पश्चिम भारताचे निरीक्षक अर्मी जैन तसेच वंडर बुक ऑफ रेकॉर्ड परीक्षक अथर्व शुक्ला आदी उपस्थित होते.या उपक्रमाचे काव्यहोत्र स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या स्मरनिकेत विधी बनसोड ची ' वेळेस माझी वाट आहे' ही कविता प्रकाशित करण्यात झालेली आहे, तसेच २०२४ला ज्ञानवर्धीनी विद्या प्रसारक मंडळ नाशिक संस्थेत घेण्यात आलेल्या ऑनलाइन कवी संमेलनात सहभाग घेऊन 'आता तरी हो जागा' ही कविता सादर करून ९३० बालकवींमध्ये महाराष्ट्रात प्रथम उत्तेजनार्थ येण्याचा मान मिळविले आहे .

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार चैताली वरघटे यांना प्रदान

प्रतिनिधी-जगदीप वन[illegible]माजीनगर- येथील तेजस फाउंडेशन वतीने, राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार सोहळा, डॉ. मौलाना आझाद संशोधन केंद्र, टीव्ही सेंटर रोड, हडको, छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाला. यावेळी प्रमुख उपस्थिती अशोक कपूर सिने अभिनेता व दिग्दर्शक मुंबई, सुरेश भाऊ डोळस ज्येष्ठ सिने अभिनेता पुणे, .राजू मोरे अभिनेता व दिग्दर्शक मुंबई, . विनोद सदानंद खंडारे सिने अभिनेता नागपूर, आयोजक अध्यक्ष तेजस फाउंडेशनच्या मेघा डोळस तसेच कवी लेखक महेंद्र तुपे इत्यादी मान्यवर उपस्थित होते मान्यवरांच्या शुभ हस्ते लेखिका कवयित्री चैताली संगोपाल वरघट यांना यावर्षीचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. चैताली वरघट या विदर्भ जिल्हा अकोला, तालुका मूर्तिजापूर येथील लेखिका आहेत. यांचे स्वलिखित साहित्य , दैनिक वृत्तपत्र, मासिक, अंक, प्रतिनिधीत काव्यसंग्रह, ब्लॉगवर वाचायला मिळतात. या समाज प्रबोधन करत समाज सेवा म्हणून साहित्य लिहत आहे तरी सुद्धा यांच्या साहित्यावर प्रेम करणारा वाचक वर्ग मोठा आहे. यांच्या लिखाणामध्ये सकारात्मकता असते. प्रेरणा दायक साहित्यातील लेख कविता कथा लिहितात. नुकताचं त्यांचा वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेला लेख मावळतीचा सूर्य हा स्पर्धा परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांकरिता



प्रेरणा देणारा, असून स्वतःच्या जगण्यावर प्रेम करणं आत्मिक पणा शिकवणारा लेख आहे. कधी आई-वडिलांबद्दल ओथंबून प्रेम वाहणारा लेख ममतेचा हुंकार असो किंवा जन्म देणा-या आई-वडिलांच्या मनातील भावना व्यक्त करणारा लेख गुंतलेला श्वास असो तर कधी संविधानावर आधारित असलेले लेख शिकलेली मुलगी असो किंवा स्त्री विषयक परिस्थिती वर्णन करणारा लेख असो. वेगवेगळ्या विषयाला धरून त्या लिहितात. स्त्रियांना प्रेरणा देणारी बरेच लेख त्यांनी लिहिलेले आहेत. घे कवेत आसमंत नुकताच यांचा प्रकाशित झालेल्या लेख क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची दखल घेणारा, सामाजिक जीवनावर प्रकाश टाकणारा, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारा,स्त्रियांना प्रेरणा देणारा आहे. तसेच प्रेम विषयक साहित्य देखील लेखिका चैताली वरघट लिहितात. मोगरा फुलला, प्रेम म्हणजे काय, प्रेमाचं घरटं, विरहाची आर्त, मनातील मोर असे बरेच लेख दैनिक वृत्तपत्रातून, साहित्यिक ॲप मधून, ब्लॉग मधून सतत प्रकाशित होत राहतात. भरपूर साहित्य लिहिण्यापेक्षा थोडं लिहावं पण दर्जेदार लिहाव,प्रेरणादायक लिहावं, सत्य परिस्थिती, सकारात्मकतेची त्याला जोड द्यावी या विचारांच्या लेखिका चैताली वरघट आहे. तेजस फाउंडेशनच्या अध्यक्ष मेघा डोळस यांनी चैताली वरघट यांच्या कार्याची दखल घेऊन पुढेही वाचक वर्गांना अजून चांगले लेख वाचायला मिळावं तसेच साहित्याचा प्रवास निरंतर असाच सुरू राहावा याकरिता यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

# पाचोरा नजीक झालेल्या रेल्वे अपघातातील जखमींची केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांनी घेतली भेट

जळगांव राजेंद्र चौधरी :- जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील परधाडे रेल्वे स्थानक जवळ भीषण रेल्वे अपघातात जखमी झालेल्या काही प्रवाशांना जळगांव येथील गोदावरी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले असून, आज २४ जानेवारी शुक्रवार रोजी केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांनी जखमी प्रवाशांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

संबंधित वैद्यकीय अधिका-यांना योग्य सूचना देत सर्वांना उत्तम उपचार मिळावेत असे केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे निर्देश देऊन, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे कडून रेल्वे अपघातातील जखमी प्रवासी व घटनेची माहिती घेतली.



## संजय अहिवळे यांना समर्पण इंटरनॅशनल अवॉर्ड प्रदान !!!

पुणे:२३ जानेवारी २०२५
स्वतः दिव्यांग असून दिव्यांगांच्या विकासासाठी प्रदीर्घ काळ योगदान देणा-या संजय अहिवळे यांना समर्पण इंटरनॅशनल संस्थेतर्फ, संस्थापक-अध्यक्ष डॉ.मधुसूदन घाणेकर आणि भारतीय जनता पार्टी-ज्येष्ठ नागरिक आघाडी - महिला विभागाच्या कार्याध्यक्ष भारती महाडिक यांच्या शुभहस्ते समर्पण इंटरनॅशनल अवॉर्ड प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानीवसुधा इंटरनॅशनल संस्थेच्या अध्यक्ष सौ. वसुधा नाईक होत्या.दादासाहेब



फाळके चित्रपट.युनियनच्या शहर अध्यक्ष मधुकर्णिका सारिका सासवडे यांनी सूत्रसंचालन केले.याप्रसंगी सौ.नीता अहिवळे यांचाही सन्मान सौ.वसुधा नाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आला.शीतल नाईक आणि वैभवनाईक यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. डॉ.मधुसूदन घाणेकर संपादित डहाळी अनियतकालिकाच्या विश्वविक्रमी ६२४ आणि ६२५व्या विशेषांकाचे प्रकाशन संजय अहिवळे आणि अन्य मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. संजय अहिवळे यांनी पुरस्काराच्या संदर्भात कृतज्ञता व्यक्त करताना त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घकालिन कार्याच्या वाटचालीवर प्रकाशझोत टाकला.
वसुधा वैभव नाईक, पुणे

## चि.श्रेयस लक्ष्मण तांबे यास भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत कास्य पदक प्राप्त.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात झालेल्या ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांच्या प्रज्ञाशोध परीक्षेत सरस्वती शाळेतील इयत्ता ६ वी तील चि.श्रेयस लक्ष्मण तांबे यास १०० पैकी ९२ गुण प्राप्त होवून कास्य पदक प्राप्त.शाळेतील संस्थापक,मुख्याध्यापक,उप मुख्याध्यापक,शिक्षक,विद्यार्थी,पालक यांच्या तर्फे अभिनंदन करण्यात आले.



# महाराष्ट्र राज्य लॉटरी बंदीबाबत विक्रेते,वितरकांची शनिवारी बैठक

महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याच्या चर्चेने राज्यात सध्या जोर पकडला आहे.या पार्श्वभूमीवर संभाव्य लॉटरी बंदी विरोधात लढा देण्याबाबत राज्यातील लॉटरी विक्रेते, वितरक हे एकवटले आहेत. त्यांची एक बैठक येत्या शनिवारी २५ जानेवारी रोजी दादर वनमाळी हॉल येथे सकाळी १० वा. होणार आहे.ही बैठक महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता सेनाने आयोजित केली असून ही बैठक संघटनेचे अध्यक्ष विलास सातर्डेकर यांच्या अध्यक्षतेखालील होणार आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरीवर




बंदी घालण्याबाबतच्या प्रशासकीय हालचाली पूर्ण झालेल्या आहेत,असा दावा विलास सातर्डेकर यांनी केला आहे.यासंदर्भात एक अभ्यासपूर्ण चर्चा बैठकीत व्हावी,लॉटरीवर बंदी का नको यावर एक मंथन, चर्चा घडवून आणण्यासाठी ही बैठक आम्ही आयोजित केल्याचे सातर्डेकर यांनी सांगितले.बदलत्या काळात, या स्पर्धेच्या काळात राज्य लॉटरीने सुध्दा बदलणे आवश्यक आहे.राज्य लॉटरीत काही बदल, सुधारणा करने गरजेचे आहे.त्याच अनुषंगाने राज्य लॉटरीत काही बदल करण्याबाबत आपल्या सूचना, कल्पना असतील तर

त्या लेखी स्वरूपात लॉटरी विक्रेते,लॉटरी वितरकांनी घेऊन याव्यात आम्ही त्याचे वाचन या बैठकीत करु.आणि या सूचना ऐकून घेतल्यानंतर त्यात गरज असेल तर त्यात सुधारणा करण्यात येतील. आणि या सूचना राज्याचे लॉटरी आयुक्त,राज्याचे वित्त सचिव व अर्थमंत्री उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठवू असे विलास सातर्डेकर यांनी म्हटले आहे.तसेच या बैठकीत संभाव्य लॉटरी बंदी राज्य सरकारने अचानक आणली तर याला गणमीकाव्याने कसा विरोध करायचा,संभाव्य लॉटरी बंदी विरोधी आंदोलन कसे करायचे याची रणनितीही या बैठकीत ठरविण्यात येणार आहे.,असे विलास सातर्डेकर यांनी सांगितले.

# नवोदित लेखक , लेखिका , कवी , कवयित्रींना ऑनलाईन स्वरुपात व्यासपीठ

## अर्लीअन समूहात साहित्यिकांची साहित्यसेवा

अर्लीअन के ए प्रा . लि .अंतर्गत अर्लीअन सोलापूर मराठी प्रतिष्ठान या समाज माध्यमातील समूहाच्या माध्यमातून सर्वच सारस्वतांना ऑनलाइन स्वरूपात व्यासपीठ मिळवून देण्यात येत आहे . यातून नवोदित साहित्यिकांना आपले साहित्य समाजासमोर आणण्याची संधी मिळत असल्याची माहिती उपाध्यक्षा कु . छाया उंब्रजकर व सर्व प्रशासकीय टीम ने दिली आहे . अर्लीअन या समूहाच्या वतीने नवनवीन उपक्रम, ऑनलाईन, ऑफलाईन स्पर्धा आयोजित करण्याचा मानस असून साहित्यिकांच्या लेखणीचे सामर्थ्य वृद्धिंगत व्हावे , नवोदित साहित्यिकांना त्यांच्या लेखनासाठी नवीन दिशा मिळावी या उद्देशाने हा समूह स्थापन केला आहे . समूहातील व रोज घेत असलेल्या उपक्रमांना ऑनलाईन प्रमाणपत्रही देण्यात येते . काही विशिष्ट प्रसंगी डिजिटल ट्रॉफी पण देण्यात येते . अर्लीअन हा साहित्य समूह सोलापूर येथे नुकताच म्हणजे ०१ँ०१ँ२०२५ पासून स्थापन झाला असून स्थापनेपासून त्याला अनेक सारस्वतांचा प्रतिसाद मिळत आहे . प्रथितयश सारस्वतांकडून नवोदितांच्या लेखणीला प्रेरणा मिळावी हाच या समूहाचा उद्देश आहे . सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह-ातील अनेक सारस्वत व वाचक या समूहात आहेत . नांदेडचे सध्या पुण्यात असलेले डॉ . सागर गूडमेवार हे या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष आहेत .सर स्वतः साहित्य कला व्यवसाय क्षेत्रातील एक नामवंत व्यक्तीमत्व आहेत . ते ट्रेनर देखील आहेत . विद्यार्थ्यांना अनेक विषयांवर ते ट्रेनिंग देतात . त्यांना २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय होनोनरी डॉक्टरेट ॲवॉर्ड




नेपाळ , काठमांडू येथून मिळाला आहे . अजून बरेच ॲवॉर्ड त्यांना मिळालेले आहेत . ३१ डिसेंबर २०२४ रोजी रात्री १२.०० वाजता अनेक समूहांना सोबत घेऊन राष्ट्रगीत गायन करून लंडन येथे वर्ल्ड रेकॉर्ड केलेला आहे . नवनवीन विषय , प्रसंगानुरूप साहित्य लेखन , लेख , निबंध , भाषिक अभ्यास याशिवाय नवोदित लोकांसाठी मार्गदर्शन पर शिबिरे , ऑनलाईन , ऑफलाईन काव्यसंमेलने , तसेच नाविन्यपूर्ण स्पर्धा महाविद्यालयीन स्तरावर , राज्यस्तरावर घेण्याचा आगामी निश्चय आहे . या साहित्य संस्थेमार्फत दररोज नवीन उपक्रम आणि नवनवीन स्पर्धा ठरवल्या जातात .यामध्ये नवोदित साहित्यिक उत्स्फूर्तपणे सहभागी होताना दिसतात .तसेच संपूर्ण महिनाभरात ज्यांनी उत्तम लेखन केलेले आहे अशा साहित्यिकांना ऑनलाईन स्वरूपात सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येते . प्रसंगानुरूप दिनविशेषा नुसार नवनवीन साहित्य निर्मिती प्रत्येकाच्या हातून व्हावी आणि मराठीची साहित्य सेवा घडावी या उद्देशाने अनेक साहित्यिक , कवी , कवयित्री तसेच पत्रकार , कलाकार , प्राध्यापक, शैक्षणिक व इतर क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती , डॉक्टर , वकील , अभियंता अशा अनेक क्षेत्रातील साहित्यिक या समूहात आहेत . ते आवडीने विविध उपक्रमात सहभागी होतात . दररोजच्या उपक्रमात घेतलेल्या विषयांवरच्या रचनांचे ई बूक तयार करत आहोत *या समूहाचे अध्यक्ष डॉ . सागर गूडमेवार , उपाध्यक्षा कु . छाया उंब्रजकर , महिला संचालिका सौ . दुर्गा जोशी ,संयोजक श्री प्रकाश महामुनी व श्री अशोक मोहिते , श्री संतोष जाधव ग्राफिक्सकार हे ऑनलाईन काम पाहतात .

## साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या कु. पूजा परमेश्वर ठोंबरे या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड



केज/प्रतिनिधीः- दिनांक २० जानेवारी २०२५ ते २२ जानेवारी २०२५ या कालावधीत जिल्हा परिषद,बीड शिक्षण विभाग ( माध्यमिक ) आयोजित ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन, सिंदफणा पब्लिक स्कूल, फुलेपिंपळगाव , ता.माजलगाव जि. बीड येथे संपन्न झाले . यामध्ये साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. ठोंबरे पूजा परमेश्वर हिची दिव्यांग गटातून प्रथम क्रमांक मिळवून अमरावती येथे होणा-या ५२ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झालेली आहे. या विद्यार्थिनीस प्राचार्य डॉ. कविता गित्ते मॅडम, विज्ञान विषय शिक्षिका डॉ.मनिषा नागरगोजे,श्रीम.श्रुती लहाने, श्री दस्तुरे, व श्री काळे यांचे म ार्गदर्शन लाभले. सदर विद्यार्थिनीची ५२ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड उद्धवरावजी कराड, संस्थेचे उपाध्यक्ष श्री राजेशजी कापसे,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेत शुभेच्छा दिल्या आहेत.

# ईडी आणि सीबीआय आले तर जमालगोटा देऊन ७२ तास संडासात बसवू - संजय राऊत

अमित शाह महाराष्ट्रात येतात ते महाराष्ट्रातील नेत्यांवर चिखलफेक करण्यासाठी येतात. अमित शाह महाराष्ट्रात येतात ते महाराष्ट्राची बदनामी करण्यासाठी येतात, राज्यातील जनतेचं मनोधैर्य खच्ची करण्यासाठी येतात. अमित शाह देशाचे सहकार मंत्री आहेत. अमित शाह जन्माला आले नव्हते तेव्हापासून महाराष्ट्राचं सहकार देशाला आदर्श आहे असं खासदार संजय राऊत म्हणाले. ङ्गपुण्यात वैकुंठलाल मेहता नावाने सहकार संस्था काम करते. ती महाराष्ट्रात आहे. अमित शाह म्हणतात म्हणून त्यावर विश्वास ठेवला पाहिजे असं नाही. अमित शाह सहकार मंत्री झाल्यापासून राज्यातील सहकाराला घरघर लागली असं संजय राऊत म्हणाले.ङ्गकाँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या लोकांना फोडण्यासाठी अमित शाह यांनी आपल्याकडच्या सहकार खात्याचा वापर करून अनेक सहकार कारखान्याचे संचालक, संस्थापक, चेअरमन यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले. ते



सहकार कारखाने बंद करण्यासाठी दबाव आणला. मुश्रीफ आणि अजित पवार यांच्या कारखान्यावर धाडी मारल्या. म्हणून कारखाने मोडीत निघाले. अनेक कारखानदारांना दिल्लीत बोलावलं जातं. आणि त्यांच्या कारखान्याच्या लहान सहान चुका सांगून त्यांना ब्लॅकमेल केलं जातं आणि मग त्यांना भाजपमध्ये घेतलं जातं. ही त्यांची मोडस ऑपरेंडी आहेअसं संजय राऊत म्हणाले.ङ्गशाह हे व्यापारी आहेत

हे काही शरद पवारांनी केलं नाही. धनंजयराव गाडगीळांपासून राज्यात सहकाराचं काम सुरू आहे. पवारांनीही कारखाने जिवंत राहावे म्हणून प्रयत्न केले. यशवंतराव चव्हाणांपासून शरद पवार यांनी सहकार चळवळ जिवंत राहावी म्हणून योगदान दिलं. मिस्टर अमित शाह यांनी दिलं नाही. सहकार क्षेत्रातील बँका कशा लुटल्या जातात ते पाहा. नोटबंदीत गुजरातमधील सहकार बँकेत कसे घोटाळे

झाले हे जगाला माहीत आहे. महाराष्ट्रात झालं नाही. विरोधी पक्षाच्या ताब्यातील कारखाने बंद करण्याचं काम शाह यांनी केलं. शाह हे व्यापारी आहेत. व्यापारी राजकारणी आहेत. त्यामुळे त्यांना सहकाराचं दु:ख कळणार नाही. ते शेअर मार्केटमधील राजकारणी आहेत. सहकार शेयर मार्केट सारखं चालवता येत नाहीङ्क असं संजय राऊत म्हणाले. राज्याला तिसरा उपमुख्यमंत्री मिळतोय जमालगोटा ते नक्की कुणाला देणार ते बघू. एक दिवस जमालगोटा शिंदेंना मिळणार आहे. राज्याला तिसरा उपमुख्यमंत्री मिळतोय. हे शिंदेंनाही माहीत आहे. हे शिंदेच्या पक्षातीलच असेल. ईडीचा जमालगोटा दिला म्हणून तुम्ही फुटला. आमच्याकडे ईडी आणि सीबीआय आला तर आम्हीही जमालगोटा देऊ आणि ७२ तास संडासात बसवू. जमालगोटा आम्हाला सांगू नका. या जमालगोट्याच्या गोळ्या ईडी आणि सीबीआयच्या आहेत. शिंदे गटालाही दिल्या आहेत. त्यामुळे त्यांची पोपटपंची सुरू आहे.

# आमोदिनी फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन जल्लोषात साजरा

-पुणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या विशेष करून महिलांचे प्रश्न सोडवुन त्यांना समुपदेशन करणा-या पुण्याच्या आमोदिनी फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन नुकताच जल्लोषात साजरा झाला.सदर कार्यक्रमाची संपुर्ण थीमङ्कमहिलांचे मानसिक स्वास्थ्यङ्कही होती. सदर कार्यक्रमास अतिथी/प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राणी खेडीकर मॅडम(बालकल्याण समिती अध्यक्षा) उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरूवात मेहना झुझम यांनी सावित्रीबाईच्या मनोगताने केली.यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ.राणी खेडीकर मॅडम यांचा यथोचित सत्कार आमोदिनींनी शाल आणि साडी नेसवून केला.प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना देहविक्री करणा-या स्त्रिया आणि त्यांची मुले यांची सत्यपरिस्थिती,त्यांना





येणा-या अडचणी त्यासाठी राणी ताई करत असलेले कार्य,अशा मुलांकडे आपण समाजाने बघायचा दृष्टीकोन बदलणे कसे आवश्यक आहे,त्याची गरज आणि अशा स्त्रियांना ख-या अर्थाने सक्षम करून त्यांचे मनस्वास्थ टिकविण्यासाठी काय करता येईल याविषयीची माहिती दिली.राणी ताईनी दिलेल्या भावनिक सादेमुळे सर्व आमोदिनींना अगदी हेलावून टाकले होते.सदर

कार्यक्रमास एमआयटी लॉ कॉलेजच्या डीन डॉ.सपना देव मॅडम उपस्थित होत्या.तसेच जेष्ठ वकील माधवी पोतदार मॅडम,एडवोकेट सुनिता बंसल मॅडम इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमांमध्येच कष्टकरी मावशी यांचा सन्मान त्यांना दैनंदिन जीवनात लागणा-या वस्तू म्हणजेच स्टील डबा आणि पिशवी देऊन आनंदाने करण्यात आला.तसेच मेहना या आमोदिनीने कष्टकरी मावशींना ओवाळले.तसेच सर्वांना हळदीकुंकू देऊन वाण देण्यात आले.सदरचे वाण व गिफ्ट आमोदिनी प्रीती शिंगवी आणि सौ. अश्विनी यांनी दिले.सदर कार्यक्रमानंतर बोलताना उपस्थित अनेक महिलांनी आमोदिनी फाउंडेशनचे कौतुक केले.तसेच आम्हाला मोलाचे मार्गदर्शन मिळाले आणि आम्हीही तुमच्या कार्यात सहभागी होऊ असे आश्वासन दिले.सदर कार्यक्रम यशस्वी

होण्यासाठी आमोदिनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा एडवोकेट अनिशा फणसळकर,उपाध्यक्षा रश्मी जोशी,सचिव एडवोकेट संध्या बागुल,खजिनदार एडवोकेट नीलिमा चव्हाण तसेच टीम आमोदिनी माधवीताई,अश्विनीताई,चिरंजीवी ताई,चित्राताई,म ोनाताई,मेघनाताई,प्रीतीताई,पल्लवी ताई,अनिताताई,कल्पनाताई,मृणाल ताई,यांनी म ोलाचे सहकार्य केले.तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एडवोकेट अश्विनी कळंबकर यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.आणि व्हीडीओ शुट महाराष्ट्र २४तासच्या मुख्य संपादक अमिता कदम यांनी केले.कार्यक्रम ाची सांगता सुस्वाद अशा अल्पोपहाराने झाली.सदर अल्पोपहार आमोदिनी रश्मी जोशी यांनी दिला होता. पुर्ण कार्यक्रम अत्यंत दिमाखात पार पडला.

## भाग्यश्री बागड यांना मराष्ट्रीय साहित्यसेवा भूषण पुरस्कार



नाशिक - साहित्यकणा फाउंडेशन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय साहित्यकणा संम ेलन ९ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे, यावेळी वलसाड, गुजरात येथील प्रसिद्ध लेखिका भाग्यश्री बागड यांना राष्ट्रीय साहित्यसेवा भूषण पुरस्कार प्रदान केला जाईल.

या पुरस्कार वितरण सम ारंभासाठी प्रा. डॉ. नरेंद्र पाठक, अकादमी सदस्य, अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. सम ारंभ दुपारी ३ वाजता सुरू होईल आणि साहित्य क्षेत्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला महत्त्व प्रदान करेल.

भाग्यश्री बागड यांची लेखनशक्ती, समाजाभिमुख दृष्टिकोन आणि साहित्य क्षेत्रातील प्रदीर्घ योगदान यांमुळे त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या काव्य, कथा आणि लेखनातील गोडवा व विचारशक्तीला मोठा आदर मिळालेला आहे.

हा पुरस्कार साहित्य क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा समजला जातो आणि त्याच्या माध्यमातून साहित्यकणा फाउंडेशन समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य करत आहे. साहित्यप्रेमी आणि लेखकांना या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचा भाग होण्याची संधी मिळेल.हा साहित्य सम ारंभ साहित्यकर्मींसाठी नवा आदर्श ठरेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

## २०२५ वर्षातील पहिली केंद्र स्तरीय शिक्षण परिषद रायगड जिल्हा परिषद शाळा खर्डी पायरीकोडं येथे संपन्न

महाड तालुक्यातील तळोशी केंद्रातील सन २०२५ वर्षातील पहिली केंद्र स्तरीय शिक्षण परिषद रायगड जिल्हा परिषद शाळा खर्डी पायरीकोडं येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली यावेळी तळोशी केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय श्री दिनेश जी गावंड साहेब,खर्डी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. दिप्ती दिनेश गावंड, नांदगाव बु.शाळेचे मुख्याध्यापक श्री. सतीश जी पोकळे सर यजमान शाळेचे मुख्याध्यापक श्री. इमरान इनुस शेख तसेच तळोशी केंद्रातील हरहुन्नरी, कर्तव्य तत्पर,दिलखुलास, हौशी,विद्यार्थी प्रिय सर्व शिक्षक बंधू भगिनी,त्याचप्रमाणे पायरीकोंड गावचे माजी फौजी आदरणीय श्री.गोविंद आप्पा वांद्रे बाबा,खर्डी गावचे माजी सरपंच साहेब आदरणीय श्री. संदेश जी महाडिक तंटामुक्ती अध्यक्ष श्री. वसंत महाडिक, माजी ग्रामपंचायत सदस्य श्री. सुभाष सुतार, श्रीम.निकिता कदम,तसेच शिक्षण प्रेमी भाऊ शेडगे मामा, शाळा



व्यवस्थापन समिती अध्यक्षा,अंगणवाडी सेविका मायाताई महाडिक, तसेच अंगणवाडी मदतनीस,पालक आदरणीय ग्रामस्थ उपस्थित होते

## एस. एम. जोशी कॉलेजच्या एन.सी.सी. कॅडेट्ची नवी दिल्ली येथे संचलनासाठी निवड



प्रतिनिधी + जगदीप वनशिव
पुणे रयत शिक्षण संस्थेचे, एस. एम. जोशी कॉलेज येथील २ महाराष्ट्र बटालियनचे तीन एन.सी.सी. कॅडेट्ची नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त संचलनासाठी निवड झाली आहे. जीएसयूओ प्रणव माणिक चिंचकर, वैष्णवी नानासाहेब गर्जे आणि महेश मच्छिंद्रनाथ गर्जे हे या वर्षी कर्तव्यपथ नवी दिल्ली येथे २६ जानेवारी २०२५ रोजी पंतप्रधान यांच्या ध्वजसंचलन समारंभात सहभागी होत आहेत. नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनासाठी एन.सी. सी. कॅडेट्सची निवड होणे ही आयुष्यात एकदाच मिळणारी संधी आहे. आणि या वर्षी निवड झालेले कॅडेट्स हे देखील कर्तव्यपथावर परेड करणारे पहिलेच आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या एस. एम. जोशी महाविद्यालयाने दरवर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कर्तव्यपथ परेड मध्ये आपले एन.सी. सी. चे कॅडेट्स पाठविण्याची परंपरा कायम ठेवली आहे. सध्या एन.ओ. म्हणून लेफ्टनंट प्रा. राधाकिसन मुठे काम पाहत आहेत. या सर्व कडेट्सचे रयत शिक्षण संस्थेचे विभागीय चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष आमदार चेतन (दादा) तुपे - पाटील, सदस्य दिलीप (आबा) तुपे-पाटील, सदस्य अमर हरिदास तुपे, प्राचार्य डॉ.सुरेश साळुंखे, उपप्राचार्य प्रो.डॉ.किशोर काकडे, उपप्राचार्य प्रा.संजय जडे, उपप्राचार्य डॉ.संजय जगताप, प्रा. किसन पठाडे यांनी त्यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी मि ळवलेल्या या यशामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन सेवक व विद्यार्थी यांचा मोलाचा वाटा आहे.

# प्रमोद सूर्यवंशी साहित्य रत्न पुरस्काराचे मानकरी



मुंबई, १८ जानेवारीः प्रसिद्ध साहित्यिक आणि ङ्गआम्ही मुंबईकरङ्क या साप्ताहिकाचे संपादक श्री. प्रमोद सूर्यवंशी यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल कोकण ग्राम विकास मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. स्वर्गीय यमुनाबाई बाजी राणे स्मृती पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित २६व्या मालवणी महोत्सवात हा सन्मान करण्यात आला.

प्रमोद सूर्यवंशी हे एक नावीन्यपूर्ण विचारांचे साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी केवळ संपादकीय लेखनच नाही, तर समाजाला प्रगल्भ संदेश देणारे अनेक लघुपटही साकारले आहेत. त्यांच्या लघुचित्रपटांनी सम ाजातील समस्यांना प्रकाशझोताखाली आणत कलात्मकतेचे आणि सामाजिक जाणिवेचे उत्तम उदाहरण दिले आहे.

त्यांना सन्मान प्रदान करताना , ङ्गप्रमोद सूर्यवंशी हे केवळ साहित्यिक नाहीत, तर समाजासाठी योगदान देणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी केलेले लेखन आणि निर्मिती हे समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी महत्त्वाचे ठरणारे आहे. असे गौरवोद्गार उपस्थित प्रमुख अतिथींनी काढले.

प्रमोद सूर्यवंशी यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या महोत्सवात मान्यवर साहित्यिक, कलाकार, आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना त्यांच्या लेखन आणि निर्मितीने साहित्य क्षेत्राला नवे वळण मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. *आम्ही मुंबईकर* या साप्ताहिकाच्या संपादनाबरोबरच, सामाजिक जाणीवा अधोरेखित करणा-या त्यांच्या लघुपटांना स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावरही
मोठा प्रतिसाद मिळाला आहे. साहित्य, कला आणि समाजसेवा या तीनही क्षेत्रात त्यांनी आजवर बजावलेली भूमिका ही अनुकरणीय आहे. प्रमोद सूर्यवंशी यांचे हे कौतुक मुंबईकरांसाठी निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com